एचओसीला पुर्नजीवन प्राप्त करून देण्यासाठी सर्वत्तोपरी सहकार्य -आमदार प्रशांत ठाकूर

# आमदार प्रशांत ठाकूर यांचा कामगारांना दिलासा

पनवेल (हरेश साठे) एकेकाळी वैभवशाली असलेल्या एचओसी कारखान्यामुळे रसायनी पाताळगंगा विभागात औद्योगिक क्षेत्र मोठया प्रमाणात निर्माण झाले. आजच्या परिस्थितीत एचओसी विकट अवस्थेतून चालली चालली आहे, कामगारांना वेळेवर पगार दिला जात नाही तसेच त्यांना देण्यात येणाऱ्या सुविधा कंपनीने बंद केलेल्या आहेत, व्यवस्थापनाने केलेल्या दुर्लक्षामुळे आज संपूर्ण कामगारवर्ग संकटातून चालले असून कामगारांवरील संकट दूर करण्यासाठी व एचओसी कंपनीला पुर्नजीवन प्राप्त करून देण्यासाठी कायम सर्वत्तोपरी सहकार्य करणार, अशी ग्वाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी बुधवारी (दि.२६) रसायनी येथे दिली.

रसायनीस्थित असलेल्या हिन्दुस्थान ऑरगॉनिक केमिकल (एचओसी) लिमिटेड मधील कामगारांच्या हक्क व न्यायिक मागण्यासाठी येथील कामगार संघटनांनी आंदोलन छेडले होते. या आंदोलनाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी आज भेट देवून कामगारांना पाठिंबा दिला. तसेच कामगारांच्या सदैव पाठिशी राहून आजपर्यंत ज्याप्रमाणे कामगारांच्या हितासाठी पाठपुरावा केला, त्याचप्रमाणे यापुढेही कार्यरत राहून कोणत्याही परिस्थितीत हा कारखाना बंद पडू द्यायचा नाही असे सांगून याकरिता कामगारांनी आपली एकजूट कायम ठेवा, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी कामगारांना केले. व्यवस्थापनाने कारखाना आणि कामगारांच्या भल्यासाठी काम करावे असा सल्ला आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणातून एचओसीचे सीएमडी व संचालक मंडळाला देवून संघर्षाची परिस्थिती निर्माण झाली तर कामगारांच्या हक्कासाठी अधिक वेगाने जावून एचओसी व्यवस्थापनाविरोधात जनआंदोलन उभारू, असा इशाराही आमदार प्रशांत ठाकूर यांनी यावेळी दिला असून आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिलेला पाठिंबा व मार्गदर्शनामुळे संपूर्ण कामगार वर्गाला दिलासा मिळाला आहे.

यावेळी कोकण श्रमिक संघाचे अध्यक्ष श्याम म्हात्रे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, रसायनी येथील हिंदुस्तान ऑरगॉनिंक केमिकल्स (एचओसी) लिमिटेड हा केंद्र सरकारचा रसायन निर्मिती करणार कारखाना म्हणून नावलौकिक होता. परंतु गेल्या काही वर्षात एचओसी कारखान्याला आर्थिक मंदी आल्यामुळे कंपनीचे जवळपास सर्वच प्लॅट बंद असून कंपनीची विकट अवस्था झाली आहे. बंद असलेले अनेक प्लॅट भंगारात काढून तेथे सपाटीकरण चालू केले असल्याचे चित्र आहे. कंपनीतील कर्मचाऱ्यांसाठी असणारी बससुविधा व कॅन्टीन सुविधा बंद करण्यात आली आहे. तर कर्मचाऱ्यांना मिळणारे वेतन महिन्यामध्ये दोन टप्प्यात देण्यात येत आहे. तसेच वसाहतीमधील सुरक्षा रक्षक, कॅंटीग कामगार यांना तीन महिने वेतन मिळत नाही. सोन्याचा धूर निघाणाऱ्या एचओसी कंपनीची दयनीय अवस्था व्यवस्थापनाच्या हलगर्जीपणामुळे झाली आहे. दरम्यान एचओसी कंपनीमधील फायद्यातील प्लॅट चालू केले तर कंपनी पुन्हा व्यवस्थित सुरू होऊ शकते. परंतू व्यवस्थापन लक्षच देत नसल्याने व्यवस्थापनाचे लक्ष वेधण्यासाठी सर्व कामगारांनी कंपनीच्या गेटसमोर धरणे आंदोलन सुरू केले आहे. सीएमडी नायर यांचा कल कोचीन युनिटकडे असल्याने कंपनीला विकट अवस्थेला सामोरे जावे लागत आहे. एचओसी व्यवस्थापन आणि कामगार संघटनेमध्ये मंगळवारी झालेल्या बैठकीत १५ मार्चपर्यंत २० कोटी रूपयांची तरतूद करून कामगारांचे पगार व सोयी देण्याचे मान्य केले आहे मात्र याच्यावर विश्वास ठेवून जमणार नाही. हे आंदोलन आज स्थगित करीत असलो तरी व्यवस्थापनाने घेतलेल्या १५ मार्चच्या मुदतीत त्याची अंमलबजावणी न झाल्यास तीव्र आंदोलन उभारू आणि एचओसी गतवैभव मिळवून देण्यासाठी प्रयत्नशिल राहू, असेही कामगार नेते श्याम म्हात्रे यांनी म्हंटले. यावेळी पारस युनियनचे अध्यक्ष राम मुंढे, महाराष्ट्र श्रमिक सेनेचे सरचिटणीस गजानन माळी, सचिन पाटील, अनंता दळवी यांचीही भाषणे झाली. यापरसंगी जिल्हा कॉंग्रेसचे सरचिटणीस प्रमोद राईलकर, गणेश ठाकूर यांच्यासह कामगार प्रतिनिधी आणि कामगार मोठया संख्येने उपस्थित होते.